माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : २०५/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री.जगन्नाथ पांडुरंग इटनारे,**
**रा.नांदुरा खुर्द, ता.नांदुरा, जि.बुलडाणा**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**दि नांदुरा इंग्लिश एज्युकेशन सोसायटी, नांदुरा व्दारा संचालित शिक्षण संस्था, ता.नांदुरा, जि.बुलडाणा**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद बुलडाणा, ता.जि.बुलडाणा**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ०१.०८.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपिलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०३.२०२० | ०१.०७.२०२० | ०१.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३९/२०१५ व ४०/२०१५ दि.२८.०३.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक ०१.०८.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. संतोष आसारामजी डोडीया व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.किशोर काकडे हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. ३९/२०१५ व ४०/२०१५) मध्ये दिनांक ०३.१०.२०१७ (आदेश पारीत दि.२८.०३.२०२०) रोजी सुनावणी घेवून " १. दोन अर्जाव्दारे अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी बिंदु नामावलीची माहिती अपिलार्थीस निशुल्क उपलब्ध करुन द्यावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. २. जात पडताळणी प्रमाणपत्राची माहिती एकापेक्षा अनेक कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वरुपाची

राज्य माहिती आयोग कार्यालय अमरावती विभाग अमरावती सत्यमेव जयते

असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश कायम करण्यात येत आहे." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, नुसार द्वितीय अपील क्र.३९/२०१५ व ४०/२०१५ दि.२८.०३.२०२० रोजी पारित केलेल्या आदेशात, तक्रारकत्याने मागितलेल्या माहिती पैकी मागितलेल्या माहिती पैकी बिंदु नामावलीची माहिती अपिलार्थीस निशुल्क उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश जारी करण्यात आले होते. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी एकूण १८ पृष्ठांची माहिती तक्रारकर्त्यास दि.०१.०७.२०२० रोजी प्रदान केलेली आढळून येते. तक्रारकर्ता यांचे म्हणण्यानूसार दि.०१.०६.२०२२ रोजी केलेल्या तक्रार अर्जात अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचा आक्षेप नोंदविला होता. मात्र या प्रकरणी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर दि.०१.०७.२०२० रोजी एकूण १८ पृष्ठांची माहिती या आधिच प्रदान केलेली असून तक्रारकर्ता यांना माहिती मिळाल्याची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलडाणा यांना देखील एक प्रत देण्यात आली होती. मात्र प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाच्या वतीने जारी करण्यात आलेले सुनावणी सुचनेच्या अनुषंगाने संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकाने उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्त्यास पुन्हा एकदा पुरवली असून जावक पृष्ठाची छायांकीत प्रत देखील सादर केलेली असून आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे याआधिच अनुपालन झाले असल्याची बाब लक्षात घेता, प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून सदर तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०१.०८.२०२३**

जावक क्रमांक १८८ दिनांक 09 JAN 2024